महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२८५०५९५ Email ID : agri-prasha2@mah.gov.in

क्रमांक: वाहन-२०२४/ प्र.क्र.६१/ नो.शा. दिनांक : २८ सप्टेंबर,२०२६.

**निविदा संदर्भात नियम व अटी**

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| १ | मोहोरबंद पाकीटात निविदा समक्ष अथवा स्पीट पोस्टाने दिनांक २९/९/२०२६ ते दिनांक ०९/१०/२०२६ या कालावधीत सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कक्ष अधिकारी, नोंदणी शाखा, दालन क्रमांक ५४६(विस्तार), पाचवा मजला, कृषि विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ येथे सादर करावी. त्यावर क्रमांक: एमएच- १२- ईपी ०९९९ "होंडा सिटी (पेट्रोल) वाहनाच्या खरेदीसाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| २ | "जशी आहे तशा स्थितीत विक्रीकरिता असलेले क्रमांकः एमएच- १२- ईपी ०९९९ होंडा सिटी (पेट्रोल) वाहन तपासणीसाठी मंत्रालयाच्या आवारात ठेवण्यात आली आहे. सदर वाहनाची आधारभूत किंमत रु.८७,०००/- इतकी आहे. |
| ३ | वाहन खरेदीमध्ये भाग घेण्यासाठी ना-परतावा असलेली ई-निविदा फीस रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) अवर सचिव, रोखशाखा, दालन क्रमांक ५१५(विस्तार), पाचवा मजला, कृषि विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ यांच्याकडे रोखीने किंवा डी.डी.ओ., महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे नांवे Account No. ४१६१९९५३७, IFSC कोड:IDIB०००N०५२, Bank Name: : **Indian Bank,** Nariman Point Branch, Mumbai-४०००२१ येथे भरणे बंधनकारक आहे. |
| ४ | ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवावयाची आहे, त्यांनी निविदा कोणत्याही परिस्थितीत दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी अथवा वरील कालावधीत समक्ष सादर करावी. निविदेसोबत पॅनकार्ड /आधारकार्ड यापैकी एक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| ५ | इसाऱ्याची रक्कम रु.५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार) अवर सचिव, रोखशाखा, दालन क्रमांक ५१५(विस्तार), पाचवा मजला, कृषि विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ यांच्याकडे रोखीने किंवा डी.डी.ओ., महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे नांवे Account No. ४१६१९९५३७, IFSC कोड:IDIB०००N०५२, Bank Name: : **Indian Bank,** Nariman Point Branch, Mumbai-४०००२१ येथे जमा करावी. |
| ६ | इसाऱ्याची रक्कम भरल्यानंतर अवर सचिव, रोखशाखा, कृषि विभाग यांच्याकडून प्राप्त झालेली |

| | |
|---|---|
| | पावती किंवा ईसीएस विवरण निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. |
| ७ | निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना उपस्थित राहता येईल. |
| ८ | यशस्वी निविदाधारकास निविदा मंजूर झाल्याचे पत्राद्वारे कळविण्यात आल्यानंतर पुढील ७ दिवसार रक्कम जमा करावी लागेल व किंवा ईसीएस ट्रांजेक्शन द्वारे रक्कम भरुन एक आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसाऱ्याच्या रकमेस त्यांना त्यास मुकावे लागेल. |
| ९ | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) कृषि विभाग Registration Number: २७MUMG०९४५४E१D८ वर भरावा लागेल. तसेच वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा शासनास सादर करावा लागेल. |
| १० | यशस्वी निविदाधारक नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल. |
| ११ | दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, overwriting, पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसेच करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत. |
| १२ | कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार सचिव कृषि, विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना राहतील. |
| १३ | क्रमांक : एमएच- १२- ईपी ०९९९ होंडा सिटी (पेट्रोल) या वाहनाच्या हस्तांतरण नोंदणी बाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकाने स्वखर्चाने करावी लागेल. |
| १४ | निविदा उघडण्याची तारीख कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार विभागाने राखून ठेवला आहे. |

**(अ.दि.घुटे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत :- अवर सचिव, रोख शाखा, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई

f:\ghute\प्र.स. वाहन ०९९९\note (१).docx

<u>**महाराष्ट्र शासन**</u>

कृषि विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

१. वाहन निर्लेखन आदेश क्र.:- वाहन-२०२४/प्र.क्र.६१/नों.शा., दिनांक १३ मार्च, २०२५ चे आदेश

२. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक: दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०२६.

| **अ.क्र.** | **विक्री करावयाच्या निर्लेखित वाहनाचा तपशिल** | |
|---|---|---|
| १ | वाहन खरेदीचा दिनांक | १२ मार्च, २०१२ |
| २ | रजिस्ट्रेशन क्रमांक व दिनांक | MH-१२-EP-०९९९ (होंडा सिटी) |
| ३ | चेसीस क्रमांक | MAKGM26BCN303362 |
| ४ | इंजिन क्रमांक | L15A73207821 |
| ५ | उत्पादक कंपनी | HONDA |
| ६ | वाहनाचा प्रकार | HONDA CITY 1.5 V MT |

# निविदा नमुना

दिनांक :

प्रति,

उप सचिव (नोंदणी शाखा)
रुम नं.५४६,
कृषि विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०००३२.

विषय :- कृषि विभागातील निर्लेखित केलेल्या वाहनाची खरेदी करणेबाबत.
संदर्भ :- कृषि विभागाची समक्रमांकाची दिनांक २९ सप्टेंबर, २०२६ ची निविदा सूचना.

महोदय,

| अ.क्र | विशेष क्रमांकः | कार्यालयासाठी राखीव |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे नाव | |
| २ | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता, दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४ | जी.एस.टी. (असल्यास) क्रमांक | |
| ५ | विशेष शुल्क रुपये ५००/- भरलेली पावती क्रमांक व दिनांक | |
| ६ | निविदेसोबत रु.५०००/- अनामत रकमेचा ड्राफ्ट (बँकेचे नाव व क्रमांक) | |
| ७ | निविदा सादर करावयाचा दिनांक | दिनांक २९/०९/२०२६ ते दिनांक ०९/१०/२०२६ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी ५.३० पर्यंत. |
| ८ | निविदा उघडण्याचा दिनांक | निविदाधारकांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. |

कृषि विभागाची निविदा सुचना क्रमांक: वाहन-२०२४/प्र.क्र.६१/नो.शा.,दि.१३ मार्च, २०२५ अन्वये कृषि विभागातील निर्लेखित केलेले वाहन क्र. “एमएच-१२-ईपी-०९९९” (होंडा सिटी) ची

विक्री करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक २९ सप्टेंबर, २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली निविदा नमुना व त्यासोबत जोडलेल्या अटी, शर्ती व सूचनांनुसार मी/आम्ही वाहन क्र. " एमएच-१२-ईपी-०९९९" (होंडा सिटी) हे रु. /- (अक्षरी.................... रुपये ) एवढी किंमत देऊन खरेदी करु इच्छितो.

मी कृषि विभागामार्फत विक्री करण्यात यावयाच्या वाहनाची पाहणी केली आहे. या प्रक्रियेकरीता विहित केलेल्या अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

आपला

निविदा सादर करणाऱ्याचे/संस्थेचे नाव/शिका

सोबत- निर्लेखित साहित्य/वस्तू विक्री करण्यासंदर्भात नियम, अटी व शर्ती.

टिप:- सदर निविदेसाठी आपली निवड झाल्यास कार्यालयीन कामकाजाच्या ५ दिवसाच्या आत कृषि विभाग(रोखशाखा), दालन क्र.५१५(विस्तार), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ येथे देकाराची रक्कम भरावी व वाहनाचा ताबा घ्यावा.